मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग
क्र.वि.क/05/२०१७

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक :

विषय : दिनांक १ जुलै ते ७ जुलै या कालावधीमध्ये ४ कोटी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालये/संस्था/विभाग यांच्या सहभागाबाबत.

संदर्भ : वित्त आणि नियोजन, वने विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२, पत्र क्र.सावंवि -२०१६/प्र.क्र.१८०/फ-११.

महोदय,

वर्ष २०१६ आणि हया वर्षातील एप्रिल महिना आधुनिक हवामान नोंदीप्रमाणे गेल्या १३७ वर्षाच्या इतिहासातील दुस-या क्रमांकाचा सर्वाधिक उष्ण महिना ठरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये २०१७, २०१८ व २०१९ हया वर्षात अनुक्रमे ४ कोटी, १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवड करण्याचे नियोजित आहे. वृक्ष लागवडीचा कालावधी प्रत्येक वर्षी १ जुलै ते ७ जुलै असा राहणार आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : सावंवि -२०१६/प्र.क्र.१८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये यांच्या परिसरामध्ये आणि त्यांच्याकडील मोकळया जागांवर वृक्षारोपणाचे उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले आहे.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये NSS, NCC, स्काऊट आणि गाईड अंतर्गत मोठया प्रमाणात विद्यार्थी सहभागी आहेत. हे विद्यार्थी प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रमाच्या वेळी विविध भागात आणि स्वयंसेवी संस्था व अंमलबजावणी यंत्रणांना स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास पुढे आल्यास सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यास मदत होईल. त्यातून तरूण व संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना वृक्ष, वन, पर्यावरण, वन्यजीव, जैवविविधता आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्राबाबत आस्था, प्रेम व जिव्हाळा निर्माण होईल. त्यातून पर्यावरण सुरक्षितता, संरक्षण व संवर्धन यामध्ये मोलाची मदत होईल.

नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रूपांतरीत करून यशस्वीरीत्या राबविण्यासाठी मोठया प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी **"महाराष्ट्र हरीत सेना"** स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी **greenarmy.mahaforest.gov.in** या संकेत स्थलाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थलावर दिनांक १५.०६.२०१७ पर्यत किमान १ कोटी लोकांनी, स्वयंस्फुर्तीने, स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे व त्यानंतर प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर किंवा एसएमएस वर पाठविले जाते.

कृपया मागे पहा...

ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणा-या सभासदांना बक्षिस योजना व इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे.

उपरोक्त विषयान्वये राज्य शासनाने वरील पत्राने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार आपणांस कळविण्यात येते की, दिनांक १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत आपण आपल्या महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या/ विभागाच्या परिसरामध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित करावेत तसेच या वृक्षांच्या संवर्धनासंदर्भातही कृती कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील/ संस्थेतील/ विभागातील शिक्षक /शिक्षकेतर /अधिकारी/कर्मचारी, NSS, NCC, स्काऊट आणि गाईड विभाग यांना प्रेरीत करून त्यांचा सहभाग घ्यावा. तसेच **greenarmy.mahaforest.gov.in** या संकेत स्थळावर जास्तीत जास्त विद्यार्थी व शिक्षकांनी महाराष्ट्र हरीत सेवेची सदस्य म्हणुन नोंदणी करण्यासाठी प्रयत्न करावेत.

आपल्या महाविद्यालयाने/संस्थेने/विभागाने आयोजित केलेल्या उपक्रमांचा अहवाल दिनांक ०९ जुलै २०१७ रोजी विद्यार्थी विकास विभागाच्या **deptstudentswelfare@gmail.com** या ईमेलवर पाठवावा.

तसेच महाराष्ट्र हरीत सेवा सदस्य म्हणून नोंदणी झालेल्या विद्यार्थी व शिक्षकांची यादी विद्यार्थी विकास विभागाच्या **deptstudentswelfare@gmail.com** या ईमेलवर दिनांक १६ जून २०१७ रोजी पाठवावी.

धन्यवाद.

(डॉ. सुनिल पाटील)
संचालक, विद्यार्थी विकास विभाग

दिनांक : ०७ जुन, २०१७

प्रत : सर्व विद्यापीठ विभाग प्रमख, सर्व संलग्नित महाविद्यालयांचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक यांना त्यांच्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर